भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक- ८/७/२०१९

# प्रेसनोट

## दरोडयाचा बनाव करणारा अटकेत
## भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी २४ तासाचे आत गुन्हा उघडकीस

दिनांक ७/७/२०१९ रोजी रात्रौ ९.०० वा सुमारास इसम नामे कल्याणसिंग ज्ञानसिंग राजपुरोहीत वय.२९ वर्ष रा. जगताप बिल्डिंग बालाजी किराणा स्टोअर्सच्या वरती कोंढणपुर फाटा खेडशिवापुर पुणे याने १०० नंबरला पोलीस नियंत्रण कक्ष पुणे शहर येथे फोन व्दारे कळविले की, दिनांक ७/७/२०१९ रोजी रात्री ८.०० वा अगर त्या सुमारास कात्रज कोंढवा रोड उडडान पुलाचे खाली ॲक्टिव्हा व ज्युपीटर मोपेडवरील ३ अनोळखी इसमांनी त्याचे मोटार सायकलला आडवी गाडी लावुन त्यास अडवुन त्यांचे तोंडावर मिरची पावडर टाकुन त्याचेकडील ५,०००००/- रोख रक्कम असलेली बॅग रात्रीच्या वेळी हमररस्त्यावरुन जबरदस्तीने चोरुन नेलेली आहे अशी हकीकत कळविलेनंतर पोलीस नियंत्रण कक्ष पुणे शहर यांचेकडुन कॉल प्राप्त झालेनंतर भारती विदयापीठ पोलीस ठाणे अधिकारी व तपास पथकाचे कर्मचारी यांनी कात्रज कोंढवा उडडान पुलाखाली जावुन सदर इसमांस पोलीस ठाणे येथे आणुन त्याची वरील प्रकाराबाबत रितसर तक्रार घेवुन ३ अनोळखी इसमांविरुध्द भारती विदयापीठ पोलीस ठाणे गु.र.नं ४७५/२०१९ भादवि कलम ३९४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन तात्काळ घटनास्थळी शिरीष सरदेशपांडे पोलीस उप आयुक्त सो उगुन्हे शाखा, स्वप्ना गोरे पोलीस उप-आयुक्त सो परि-१/२ पुणे , डॉ.प्रिती टिपरे सहा.पोलीस आयुक्त सो लष्कर/स्वारगेट विभाग पुणे, समीर शेख सहा.पोलीस आयुक्त सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे , राजेंद्र मोहीते पोलीस निरीक्षक खंडणी विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी स्टाफसह भेट देवुन तपासाबाबत सुचना व मार्गदर्शन केले.

तदनंतर भारती विदयापीठ पोलीस ठाणे तपास पथक अधिकारी महेंद्र पाटील व तपास पथकाचे कर्मचारी यांना कल्याणसिंग ज्ञानसिंग राजपुरोहीत हा दिलेली तक्रार हि बनावट असल्याचे संशय आल्याने त्यास विश्वासात घेवुन पोलीस खाक्या दाखविल्या असता त्याने तपासादरम्यान त्याने कबुली दिली कि त्याचेवर २ ते ३ लाख रुपयाचे कर्ज झालेले असल्याने ते फेडणेसाठी त्याने व त्याचे साथीदार अर्जुन बंजारा व प्रकाश राजपुरोहीत असे तिघांनी मिळुन ५ लाख रुपायाचा परस्पर अपहार केलेला आहे. जबरी चोरी झालेचा बनाव केलेला असल्याचे सांगितले.

सदर गुन्हयामध्ये फिर्यादी १) कल्याणसिंग ज्ञानसिंग राजपुरोहीत वय.२९ वर्ष रा. जगताप बिल्डिंग बालाजी किराणा स्टोअर्सच्या वरती खेडशिवापुर कोंढणपुर फाटा पुणे यांस व त्याचे साथीदार २) अर्जुन प्रेमजी बंजारा वय.३५ वर्ष रा. जगताप बिल्डिंग बालाजी किराणा स्टोअर्सच्या वरती खेडशिवापुर कोंढणपुर फाटा पुणे ३) प्रकाश रुपसिंग राजपुरोहीत वय.२३ वर्ष रा. बालाजी स्विट होम दत्तनगर पोलीस चौकीसमोर जांभुळवाडी रोड दत्तनगर आंबेगाव बु।। पुणे यांना अटक करुन त्यांचेकडुन गुन्हयातील ५ लाख रुपये हस्तगत केलेली आहे. पुढील तपास विष्णु ताम्हाणे पोलीस निरीक्षक गुन्हे भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री श्रीकांत तरवडे सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.प्रीती टिपरे मॅडम सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील, पोलीस कर्मचारी श्रीधर पाटील, कृष्णा बढे, गणेश सुतार, उज्वल मोकाशी, प्रणव संकपाळ, समीर बागसिराज, सचिन पवार, सर्फराज देशमुख, जगदीश खेडकर, शिवदत्त गायकवाड, राहुल तांबे, गणेश चिंचकर यांचे पथकाने केलेली आहे.